ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार २१ डिसेंबर, १९६६ | अंक २३

**सीलोनला २ कोटी रुपयांचा माल**—चालू वर्ष संपण्याच्या आत भारत सीलोनला ६० लाख रुपयांचे वाळवलेले मासे, ६० लाख रुपयांच्या मिरच्या आणि ८० लाख रुपयांचे विविध प्रकारचे कापड तातडीने पुरविणार आहे. सीलोनला परदेशीय चलनाच्या टंचाईला तोंड देता यावे म्हणून भारत सरकारने दोन कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे. कर्जाची मुदत ३ वर्षांची आहे. सीलोनमधील लोकांना गरजेच्या वस्तू पुरविण्याची विनंती त्या देशाच्या सरकारने भारताला केली होती.

**नद्यांचा रासायनिक अभ्यास**—भारतामधील काही नद्यांच्या पाण्याचा रासायनिक अभ्यास करण्याचे मध्यवर्ती सरकारच्या पाणीपुरवठा व वीज खात्याने ठरविले आहे. गंगा, गंडक, कोसी, आणि ब्रह्मपुत्रा ह्या उत्तर भारतामधील आणि चंबळ, नर्मदा, तापी आणि यमुना ह्या मध्य विभागातील नद्या अभ्यासासाठी निवडण्यात आल्या आहेत.

**चेंबर्सच्या ज्ञानकोशाची नवी आवृत्ती**—ब्रिटनमधील प्रसिद्ध चेंबर्स ज्ञानकोशाची चौथी आवृत्ती तयार करण्यात येत आहे. ह्या ज्ञानकोशाचे एकूण १५ खंड होतील. त्यासाठी १० लाख पौंडांपेक्षाही अधिक खर्च येणार आहे. ज्ञानकोशातील शब्दसंख्या १ कोटी, ४५ लाख होईल. येत्या जानेवारीत तो बाजारात दिसू लागेल.

**सहकारी साखर कारखाना**—गुजरात राज्यात पुढील वर्षी आणखी एक सहकारी साखर कारखाना उभारण्यात येणार आहे. कारखान्यासाठी जुनागढ जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. सहकारी संघटनेने १० लाखांचा निधी जमा केला असून १·२० कोटी रुपये किमतीच्या यंत्रसामग्रीची मागणी नोंदविली आहे. राज्यात ४ ठिकाणी सहकारी कारखाने आहेत.

**रेशमाच्या कारखान्याची विक्री**—बंगलोर येथील सरकारी मालकीच्या रेशमाच्या कारखान्याला दरसाल २५ लाख रुपयांचा तोटा होत आहे. कारखान्याच्या कामात सुधारणा करून तो व्यवस्थित चालविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. ह्या प्रयत्नांना अपयश आल्यास कारखाना विकून टाकण्यास सरकार अनमान करणार नाही, असे म्हैसूरच्या अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

**आगगाडीच्या डब्यांची मागणी**—पेरांबर येथील रेल्वेचे डबे तयार करणाऱ्या कारखान्याकडून ६६ प्रवासी डबे मिळविण्यासाठी ब्रह्मदेशाच्या सरकारने मागणी नोंदविली आहे. मागणी पुरी केल्यावर भारताला १६ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळेल. ब्रह्मदेशाकडून आणखी ३०० डब्यांची मागणी येण्याचा संभव आहे. थायलंडच्या सरकारने दोन रेल्वेचे डबे नमुन्यादाखल मागविले आहेत.

**हजार एकरांची शेते**—४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात आसाम राज्यात १ हजार एकरांच्या तीन मोठ्या शेतवाड्या स्थापन करण्यात येणार आहेत. ८०० एकरांची एक शेतवाडी ह्यापूर्वीच चालू करण्यात आली आहे. बटाट्यांच्या बियाणाची निर्मिती करणारे एक खास केंद्र उभारण्यात येत आहे. शेतवाड्यावर काम करण्यासाठी तरुणांना उत्तेजन देण्यात येईल.

**निर्यात-आयात बँकेचे कर्ज**—अमेरिकेच्या निर्यात-आयात बँकेने भारताला १ कोटी, २७ लाख, ५० हजार डॉलर्सचे कर्ज मंजूर केले आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारताने वाराणसी येथील डिझेल रेल्वे एंजिनांच्या कारखान्यासाठी लागणारे सुटे भाग अमेरिकेत खरेदी करावयाचे आहेत. १९५७ पासून बँकेने भारताला दिलेल्या कर्जाची एकूण रकम आता ४३.५ कोटी डॉलर्स झाली आहे.

**रशियाची नवी राज्यघटना**—रशियन कम्युनिस्ट पत्राच्या 'प्रावदा' ह्या मुखपत्राने असे जाहीर केले आहे की पुढील वर्षी रशियांत नवी राज्यघटना घोषित करण्यात येईल. ही घटना प्रचलित राज्यघटनेच्या मानाने खूपच लोकशाही प्रवृत्तीची असेल असे सूचित करण्यात येत आहे. १९१७ साली स्थापन झालेल्या नव्या रशियन राज्याचा ५० वा वर्धापन दिन पुढील साली साजरा केला जाईल. त्या प्रसंगाने नवी राज्यघटना अमलात येणार आहे.

**सौराष्ट्रात सोयाबीनची लागवड**—जुनागड येथील तेलबीया संशोधन केंद्राने अमेरिकन सोयाबीनच्या लागवडीचा प्रयोग करण्याचे ठरविले आहे. गुजरातमधील हवापाण्यात येण्यासारखे ७० प्रकारच्या सोयाबीन्सचे बियाणे अमेरिकेतून आयात करण्यात आले आहे. ह्या बियाणाचा वापर करून दर एकरी एक हजार किलोग्रॅम सोयाबीन्सचे पीक काढता येईल असा अंदाज आहे. पीक हाती पडण्यास ४ महिन्यांचा अवधी लागतो.

**चीनच्या हस्तक्षेपाचा संभव**—पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान ह्यांनी फ्रान्समधील आपल्या दौऱ्यात एका प्रसंगी बोलताना असे उद्गार काढले की, भारत व पाकिस्तान ह्यांच्यात पुन्हा सशस्त्र संघर्ष झाला तर त्याचे क्षेत्र उभयता देशांच्या प्रदेशापुरतेच मर्यादित राहीलच असे खात्रीने सांगता येणार नाही.

**द्रव जळणासाठी देशी टाक्या**—हैद्राबाद येथील एका कारखान्याने खनिज तेलापासून बनविलेले द्रव जळण भरण्यासाठी लागणाऱ्या टाक्या तयार करण्यास प्रारंभ केला आहे. घरगुती व औद्योगिक वापरासाठी ह्या जळणाचा झपाट्याने प्रसार होत आहे. ह्या क्षेत्रात इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने आता प्रवेश केला आहे. अजूनही टाक्यांची टंचाई आहे.

## श्री. शंतनुराव किर्लोस्करांच्या औद्योगिक व वैचारिक नेतृत्वाचा जागतिक बहुमान

कॅनडा देशाचा शताब्दी महोत्सव एप्रिल ते ऑक्टोबर, १९६७ मध्ये साजरा होणार आहे. त्यानिमित्त कॅनडाची व्यापारी राजधानी, मॉंट्रिअल येथे एक प्रचंड प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. त्याचे स्वरूप आंतरराष्ट्रीय असून त्यात भारतही भाग घेणार आहे. ह्या प्रदर्शनाला जोडूनच "मॅन दि प्रोड्यूसर" ह्या व्यापक विषयाच्या अंगोपांगावर आपले स्वतःचे मौलिक विचार मांडण्यासाठी जगातील नामवंत उद्योगपती, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, इत्यादींना पाचारण करण्यात आले आहे. अशा ह्या निवडक पंधरा-वीस जागतिक महत्त्वाच्या व्यक्तींत श्री. शंतनुराव किर्लोस्करांचा समावेश झालेला आहे. त्यांच्या भाषणाचा दिवस १७ मे, १९६७ हा असून त्यांच्या भाषणाचा विषय 'प्रगतिशील लोकशाही देशांतील नियोजनाची वाटचाल', ह्या स्वरूपाचा असेल. श्री. शंतनुरावांच्या औद्योगिकच नव्हे, तर वैचारिक नेतृत्वाचा ह्या जागतिक बहुमान आहे, यात संशय नाही.

### इतिहासावर बोळा फिरविणारे प्रे. आयूबखान

पाकिस्तानचे अध्यक्ष आयूबखान ह्यांनी ब्रिटनच्या आपल्या दौऱ्यात अनेक भाषणे केली. त्यांपैकी एका भाषणात तर भारत व पाकिस्तान ह्यांच्यामधील संबंध उभयता देशांचे संयुक्त-संघ-राज्य स्थापून सुधारता येतील काय, असा प्रश्न विचारण्यात आला, त्यावर भारताची फाळणी झाली हेच बरोबर झाले, नाहीतर परिस्थिती आणखीच चिघळली असती, असे उत्तर त्यांनी दिले. त्यांचे भाषण ऐकण्यास आलेल्या दोघा तरुण पाकिस्तान्यांनी मात्र ह्या बाबतीत वेगळे मत व्यक्त केले. ते म्हणाले, "अध्यक्ष आयूबखान गेल्या ५ शे वर्षांच्या इतिहासावर बोळा फिरवीत आहेत; आणि भारतामध्ये शांततेने राहात असलेल्या ५ कोटी मुसलमानांकडे दुर्लक्ष करीत आहेत. खरे म्हणजे हिमालयाच्या दक्षिणेस राहणारे सर्व लोक एकाच समाजाचे घटक आहेत." भारत आणि पाकिस्तान ही दोन धार्मिक राष्ट्रे असल्याचा दावा मरहूम जिना करीत असत. वास्तविक जिनांना धर्माचे सोयरसुतक काहीच नव्हते. परंतु कॉंग्रेसमधील लोकशाही प्रवृत्ती व साधेपणा ह्यांचे त्यांना वावडे होते. म्हणून ते १९२० साली कॉंग्रेसमधून बाहेर पडले. त्यांची स्वतःची राहणी अतिशय खर्चिक आणि पाश्चात्त्य वळणाची होती. १९३७ सालापर्यंत तरी मुस्लीम लीग ही संघटना वरिष्ठ मध्यमवर्गीयांची होती. मुसलमान जमीनदार, संस्थानिक आणि नवोदित बुद्धिवादी मध्यमवर्ग ह्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठीच लीगची स्थापना झालेली होती. त्यानंतरच्या १० वर्षांत लीगचे सामर्थ्य कसे वाढले हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. परंतु १९३९ साली ब्रिटिश राजवटीने कॉंग्रेसला दुखविले नसते आणि १९४२ साली कॉंग्रेसवर दडपशाही केली नसती तर लीगचे सामर्थ्य इतक्या वेगाने वाढले नसते, असे म्हणता येईल. परिणामी, भारताची फाळणी कदाचित टळलीही असती.

### शेतीच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय निधी

आर्थिक सहकार्य आणि विकास ह्या क्षेत्रांत काम करणारी एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. संघटनेचे २१ देश सभासद आहेत. ह्या संघटनेच्या शासकीय कार्यकर्त्यांची ६ वी वार्षिक बैठक पॅरिसमध्ये भरविण्यात आली होती. बैठकीत बोलताना अमेरिकेचे उपपरराष्ट्रमंत्री मि. रॉस्टो ह्यांनी अशी सूचना केली की, विकसनशील देशांतील शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी एखादा आंतरराष्ट्रीय निधी उभारण्यात यावा. अशा निधींतून मागासलेल्या देशांना रासायनिक खताचा पुरवठा करता येणे आणि शेतीची अवजारे पुरवता येणे शक्य होईल. ते पुढे म्हणाले की विकसनशील देशांपुढे तीन मुख्य प्रश्न आहेत. पहिला प्रश्न पुरेशा अन्नाचा आहे. दुसरा, ह्या देशांना स्वतःच्या पायावर उभे कसे करावे हा आणि तिसरा ह्या देशावर असणाऱ्या कर्जाच्या बोजाचा. ह्या देशांतील शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी खाजगी मालकीच्या भांडवलाने जास्तीत जास्त पुढाकार घेतला पाहिजे. विकसनशील देशांतील शेतकऱ्यांची शेतीची साधने लवकरात लवकर सुधारण्यात आली पाहिजेत; आणि हे काम त्यासाठी उभारलेल्या आंतरराष्ट्रीय निधीमार्फतच चांगले होऊ शकेल. अर्थात, हा निधी परिणामकारक ठरण्याइतका मोठा असला पाहिजे. ह्या विषयावर बोलताना फ्रान्सचे अर्थमंत्री म्हणाले की, विकासासाठी मदत देता यावी म्हणून औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांनी जरूर तर आर्थिक त्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे. याचबरोबर जे देश मदत घेतात त्यांनीही आपले परावलंबन दूर करण्यासाठी खास प्रयत्न करण्याची अतिशय आवश्यकता आहे.

### उद्योगधंद्यांची मंदगतीची वाटचाल

औद्योगिक उत्पादनाचा जो सरकारी ताजा निर्देशांक तयार करण्यात आला आहे त्यावरून असे दिसते की १९६६ च्या पहिल्या ८ महिन्यांच्या अवधीत उद्योगधंद्यांची वाटचाल मंदगतीची होती. जानेवारी ते ऑगस्ट ह्या कालातील उत्पादनाचा सरासरी निर्देशांक २.२ टक्क्यांनी वाढलेला आहे. परंतु वर्षाच्या ह्याच अवधीत सरासरी निर्देशांक ८ टक्क्यांनी वाढलेला आहे. म्हणजे प्रगतीचा वेग मंदावलेला आहे. रुपयाचे अवमूल्यन केल्यानंतर आयातीचे धोरण काहीसे सैल करण्यात आले. त्याचा परिणाम दिसून येण्यास चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत वाट पाहावी लागेल असा अंदाज करण्यात येत आहे. ते काही असले तरी चालू वर्ष मागील वर्षाप्रमाणेच विकट औद्योगिक कुचंबणेचे म्हणूनच स्मरणात राहील. एप्रिल ते जून महिन्यापर्यंतचे जे आकडे जमा करण्यात आले आहेत त्यावरून अनेक महत्त्वाच्या उद्योगधंद्यांतील उत्पादन घटले आहे. ह्या उद्योगधंद्यांत पुढील उद्योगधंद्यांची गणना आहे. अल्युमिनम, तांबे, नत्रयुक्त रासायनिक खते, सल्फ्युरिक ॲसिड, रेल्वेच्या वाघिणी, मोटारी, मोटार सायकल्स व स्कूटर्स, वाहनासाठी लागणारी डिझेल एंजिने, रबराच्या टायर्स व ट्यूब्ज, विजेचे पंखे, तागाचे कापड, कापसाचे सूत व कापड, रेयॉन धागा आणि वनस्पती तूप. ह्या यादीवरून ग्राहकोपयोगी मालाच्या निर्मितीत जशी घट झाली आहे तशीच त्या मालाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या मालाच्या निर्मितीतही घट झालेली दिसून येते. त्याशिवाय सिमेंट, कोळसा, वीज, सायकली, शिवणाची यंत्रे ह्यांची निर्मितीही कमी प्रमाणात झाली. रेडिओ, विजेचे दिवे, कागद व कागदाच्या वस्तू, यांत्रिक अवजारे इत्यादी मालाचे उत्पादन वाढले आहे.

**नवीन झोतभट्टी**—भिलाई येथील पोलादाच्या कारखान्यांतील ५ व्या झोतभट्टीचा उद्घाटन समारंभ नुकताच करण्यात आला. ह्या प्रसंगी बोलताना लोखंड व पोलादखात्याचे मंत्री श्री. सिंग म्हणाले की पोलादाच्या निर्मितीच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर भारत झपाट्याने पावले टाकीत आहे. लवकरच संपूर्ण पोलादाचा कारखाना भारत स्वतःच्या बळावर उभारू शकेल. बोकॅरो येथे उभारण्यात येत असलेल्या ५ व्या पोलादाच्या कारखान्यापैकी ६० टक्के भाग भारतात तयार झालेला असेल.

# अर्थ

बुधवार, २१ डिसेंबर, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## महात्मा गांधींचे अर्थशास्त्र व्यावहारिक होते

पुणे विद्यापीठातर्फे महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाविषयी आचार्य कृपलानी यांनी व्याख्याने दिली. त्यांपैकी शेवटच्या व्याख्यानात आचार्य कृपलानी ह्यांनी महात्माजींच्या अर्थ-शास्त्रविषयक विचारांचा परामर्ष घेतला. ते म्हणाले की, महात्माजींची आर्थिक विचारसरणी शेख महंमदी अगर वस्तु-स्थितीपासून दुरावलेली नव्हती. तिची पाळेमुळे सत्यसृष्टीत रुजलेली होती. त्यांच्या विचारसरणीला अनेक पाश्चात्त्य तत्त्वचिंतकांनी पाठिंबा दिलेला होता. समाजाच्या सांस्कृतिक आणि नैतिक विकासाच्या मार्गात मर्यादेपलीकडे गेलेले यांत्रिकीकरण आणि आर्थिक व्यवहारांचे केन्द्रीकरण हा मोठा शत्रू आहे असे महात्माजींचे मत होते, आणि अनेक पाश्चात्त्य समाजधुरीणांनाही त्यांची जाणीव झालेली होती. आर्थिक क्षेत्रातील केंद्रीकरण लोकशाहीला मारक होते अशी त्यांची धारणा झालेली होती. महात्माजींची विश्वस्ताची कल्पना पूर्णपणे समर्थनीय अशीच आहे. विश्वस्त हा मालमत्तेचा मालक नसतो. मालमत्तेचा उपयोग लाभाधिकाऱ्याच्या हितासाठी करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आलेली असते. भांडवलदारांनी विश्वस्ताची भूमिका घ्यावी अशी गांधीजींची अपेक्षा होती. आर्थिकच काय पण इतर कोठल्याही क्षेत्रात विश्वस्ताची कल्पना सोडून देता येणार नाही. रशिया, चीन व इतर कम्युनिस्ट देशांतील सत्ताधारी लोक स्वतःला कामगार वर्गाचे विश्वस्त असेच म्हणवून घेत आहेत आणि कामगारांच्या हिताचे काय आहे ते स्वतःच ठरवीत आहेत. त्याचप्रमाणे भारतासकट सर्व लोकशाही देशांतील सत्ताधारी सरकारेही स्वतः लोकांचे विश्वस्त असल्याचे मानीत असतात. सांस्कृतिक आणि नैतिक मूल्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आचरली जावीत ह्या श्रद्धेवर गांधीजींची आर्थिक विचारसरणी आधारलेली होती. आर्थिक नीतिमत्ता इतर क्षेत्रांतील नीतिमत्तेपेक्षा वेगळी आहे असे ते मानत नव्हते.

---

## परदेशीय भांडवलाबाबत लवचिक धोरण हवे

असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेचे वार्षिक अधिवेशन कलकत्ता येथे भरविण्यात आले होते. ह्या-प्रसंगी बोलताना संघटनेचे अध्यक्ष मि. जार्डिन पॅटरसन म्हणाले की, भारत सरकारने आपल्या परदेशीय भांडवलाबाबतच्या धोरणाची नीट तपासणी करणे आवश्यक आहे. परदेशीय भांडवल भारतात गुंतविण्यापूर्वी ज्या अटींचा स्वीकार करावा लागतो त्या रद्द करण्यात आल्या पाहिजेत. तरच नवे कारखाने काढण्यास उत्तेजन मिळून परदेशीय भांडवल आकर्षित होईल. भारताने रुपयाचे अवमूल्यन केल्यापासून ह्या देशात भांडवल गुंतविलेल्या अगर गुंतवू इच्छिणाऱ्या कंपन्यांना नव्या परिस्थि-तीला तोंड द्यावे लागत आहे. हिंदच्या आर्थिक कारभाराविषयी परदेशीय कंपन्यांना पहिल्याइतका विश्वास वाटेनासा झाला आहे. सध्या भारतात ज्या परदेशीय कंपन्या आहेत त्यांना आता पहिल्यापेक्षा कितीतरी अधिक नफा कमवावा लागेल; नाहीतर त्यांना स्वतःच्या नफ्याची पातळी आहे तितकी ठेवता येणार नाही. परदेशी कंपन्या हिंदी कंपन्यांशी सहकार्य करून जे कारखाने ह्यापुढे काढतील त्यांना यंत्रसामग्रीच्या आयाती-साठी अधिक किंमत द्यावी लागेल. अर्थात परदेशीय चलनाच्या बदला रुपयांतील रक्कम अधिक मोजावी लागेल. सध्या असलेल्या परदेशीय कंपन्यांनी स्वतःचे हितसंबंध काढून घ्यावयाचे ठरविले तर त्यांच्या गंगाजळीवर ताण पडेल आणि शिवाय भांडवल-बाजारातील विश्वास घसरणीला लागेल. परदेशी कंपन्यांच्या साह्याने जे नवे औद्योगिक उपक्रम हाती घेण्यात येतात त्यात गुंतवावयाच्या साधारण भाग भांडवलाच्या प्रमाणाबाबत भारत-सरकार आणि परदेशी कंपन्या ह्या दोघांनीही अधिक लवचिक धोरण स्वीकारले पाहिजे. तरच सद्यःपरिस्थितीतून मार्ग निघ-ण्याची शक्यता आहे.

---

## शेतीच्या यांत्रिकीकरणाची तातडीची आवश्यकता

भारतामधील शेतीच्या उत्पादनाबद्दल बोलताना, दिल्ली येथे अन्नमंत्री श्री. सुब्रम्हण्यम् ह्यांनी काही विचार व्यक्त केले आहेत. शेतीच्या उत्पादनात वाढ करण्याविषयी जरूर अस-णाऱ्या कृतीबद्दल त्यांनी सूचना केल्या. ते म्हणाले की हिंद-मधील लोकसंख्येत शेतकऱ्यांचे प्रमाण सध्या ७५ टक्के आहे. ते ४० टक्क्यांपर्यंत खाली आणल्याशिवाय शेती फलप्रद करता येणे अशक्य आहे. शेतीचे देशातील उत्पादन कमी असण्याची आणखीही काही कारणे आहेत. हिंदमधील शेतीत माणसाच्या श्रमाचा भाग फार असतो, यांत्रिक अवजारांचा वापर फार अल्प होतो आणि शेतजमीन एकसंध नसते; ती अनेक ठिकाणी विखुरलेली असते. आधुनिक शेतीसाठी जमिनीचे एकत्रीकरण करणे जरूर असते. परंतु ह्या बाबतीत पंजाब, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र ह्या राज्यांनीच थोडीबहुत कृती केली आहे. इतर राज्यांना आर्थिकदृष्ट्या न परवडणाऱ्या शेतजमिनीच्या तुकड्यांची अडचण अद्याप समजलेली दिसत नाही. शेतीचे यांत्रिकीकरण करण्यात आले तर पेरणी व कापणी ह्यांमधील कालावधी कमी करता येईल व त्यामुळे जमिनीत तीन पिकेही घेता येणे शक्य होईल. उत्पादित अन्नधान्य वाया जाऊ नये म्हणून सरकार आपल्या परीने प्रयत्न करीत आहे. ग्रामीण भागातील धान्य साठविण्याची व्यवस्था तज्ज्ञांनी केलेल्या शिफारसींना अनुसरून सुधारण्यात येत आहे. उंदीर आणि तत्सम प्राणी उभ्या धान्याची शेतातच अधिक खराबी करतात. गुदामात धान्य त्या मानाने अधिक सुरक्षित राहते. उंदरा-सारख्या प्राण्याकडून होणारा धान्याचा नाश थांबविण्याच्या बाबतीत अद्याप यश आलेले नाही. तथापि, त्यांचा कायमचा निकाल लावण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या भागांतील उंदरांचा जीवशास्त्रीय अभ्यास करण्यात येत आहे.

---

## श्रीमंतांना इषारा

नेहरू-स्मृती व्याख्यानमालेत बोलताना नियोजन समितीचे एक सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव म्हणाले की आशियातील व आफ्रिकेतील देशांना स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याच्या कामी पं. नेहरू ह्यांनी कोणाही एका व्यक्तीपेक्षा अधिक कामगिरी बजावली आहे. परंतु आर्थिक नियोजनाचा शिल्पकार ह्या नात्याने मात्र त्यांना तितके यश आले नाही. भावी आर्थिक विकासाचा पाया घालण्यात तर ते यशस्वी होऊ शकले नाहीतच; पण समाजवादाची स्थापना करण्यासाठी आवश्यक असणारे सामाजिक वातावरणही ते निर्माण करू शकले नाहीत. समाजवादी पद्धतीची समाजरचना करण्यासाठी लागणारा पाया अद्याप घातला गेलेला नाही. समाजातील सुखवस्तू लोकांनी येती १० वर्षे निष्ठेने व साधेपणाने जगण्यास शिकले पाहिजे. तरच स्वावलंबी व स्वयंसिद्ध गती असणारी अर्थव्यवस्था भारतात निर्माण होऊ शकेल. सध्या देशाची स्थिती अशी आहे की, अपुरी प्रगती ही अजिबात प्रगती न होण्यापेक्षाही धोक्याची ठरेल. समाजातील असहाय लोक, काही थोडे लोक ऐषआरामात लोळत असल्याचे दृश्य सहन करणार नाहीत ह्याची श्रीमंतांनी दखल घ्यावी. १९४३ च्या बंगालच्या दुष्काळात लाखो लोक कलकत्त्याच्या रस्त्यांवर अन्न पदार्थांच्या दुकानांच्या जवळपास मरण पावले. पण, आज अशी परिस्थिती लोक सहन करणार नाहीत. उपासमारीने पिडलेले लोक धान्याच्या गाड्या अडवीत आहेत आणि धान्य दुकानांची लुटालूट करीत आहेत. देशात जोपर्यंत भांडवलदारी मनोवृत्ती पसरलेली आहे तोपर्यंत समाजवादाच्या ध्येयाच्या जवळपास जाणेसुद्धा अशक्य आहे. श्रीमंतांनी अधिकाधिक आर्थिक लाभाची इच्छा सोडून दिली पाहिजे आणि बिगर-आर्थिक सवलतींवर संतुष्ट राहिले पाहिजे.

## घड्याळे तयार करण्याचे नवीन कारखाने

बंगलोर येथे हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याने घड्याळे तयार करण्यास सुरुवात केल्यापासून ५ वर्षांचा अवधी लोटला आहे. हा कारखाना १९६१ मध्ये स्थापन करण्यात आला. त्या वेळी त्यात घड्याळांचे सुटे भाग आयात करून ते जुळविण्याचेच काम करण्यात येत असे. घड्याळांसारखी नाजूक यंत्रे भारतात तयार करता येतील की नाही ह्याविषयी तेव्हा शंका व्यक्त करण्यात येत होती. पण नंतर अवघ्या दोन वर्षांच्या अवधीत ६० टक्के भाग देशी असणारी घड्याळे कारखान्यात तयार होऊ लागली. लवकरच संपूर्णतया स्वदेशी बनावटीची घड्याळे कारखान्यात तयार होऊ लागतील अशी अपेक्षा करण्यात येत आहे. कारखान्यात उत्पादनास प्रारंभ झाला त्यावेळी दरसाल १४ हजार घड्याळे तयार करण्यात येत होती. आता कारखान्याची उत्पादनक्षमता दरसाल ३ लाखापर्यंत वाढली आहे. तयार होणारी घड्याळे गुणवत्ता आणि आकर्षकता ह्या बाबतींत लोकांच्या पसंतीस उतरलेली आहेत. बंगलोरच्या सरकारी मालकीच्या कारखान्याखेरीज मुंबई येथे घड्याळे तयार करण्याचे दोन खाजगी मालकीचे कारखाने आहेत. तथापि ह्या सर्व कारखान्यांचे उत्पादन देशातील गरज भागविण्यास अपुरे पडत आहे. भारतात दरसाल २० लाख नव्या घड्याळांची गरज आहे. त्यापैकी सुमारे एक तृतीयांश गरज सध्याचे कारखाने भागवू शकतात. एक वर्षापूर्वी एका स्विस कंपनीने घड्याळांचा कारखाना काढण्याबाबत भारताला मदत देण्याची तयारी दाखविली होती. पण ह्या योजनेचा विचार भारत सरकारने अद्याप केलेला नाही. रशियाच्या सहकार्याने खाजगी क्षेत्रात दोन कारखाने काढण्याची योजनाही अजून विचाराधीनच आहे.

## अमेरिकेस गेलेले ४० टक्के हिंदी विद्यार्थीच परत येतात

आधुनिक उत्पादनतंत्रात आघाडीवर असलेल्या देशांत शिक्षण घेण्यासाठी अनेक हिंदी विद्यार्थी जातात. त्यांनी शिक्षण संपल्यावर मायदेशी परतून आपल्या ज्ञानाचा फायदा द्यावा अशी अपेक्षा करण्यात येते. ही अपेक्षा फारशी फलद्रूप होत नाही असे आढळून आले आहे. शिक्षणासाठी गेलेले कितीतरी विद्यार्थी शिक्षण संपल्यावरही अमेरिकेतच स्थायी होतात. ह्यासंबंधी करण्यात आलेल्या पाहणीप्रमाणे ९४ हजार परदेशीय विद्यार्थ्यांपैकी ११ हजार विद्यार्थी अमेरिकेतच राहण्याचे ठरवीत असल्याचे दिसून आले. शिक्षणासाठी येणाऱ्या परदेशांतील विद्यार्थ्यांपैकी ३० टक्के विद्यार्थी अमेरिकेतच राहण्यासाठी अर्ज करतात. भारतामधून व नॉर्वेमधून आलेल्या विद्यार्थ्यांपैकी ४० टक्के विद्यार्थीच आपआपल्या देशांना परत जातात. फॉर्मोसा, हॉंगकॉंग, दक्षिण कोरिया व ग्रीस ह्या देशांतील तर १० टक्के विद्यार्थीच परततात.

## गुजरातमधील नोकरी करणाऱ्या स्त्रियांत वाढ

गुजरात राज्यातील उद्योगविनिमय केंद्रात जमा होणाऱ्या माहितीवरून असे दिसून आले आहे की त्या राज्यात नौकरीसाठी नावे नोंदविणाऱ्या व नौकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत चालली आहे. गुजरात राज्याची स्थापना झाल्यानंतरचे ह्याबाबतीतील आकडे असे आहेत. १९६० : नोंदणी ६,५५०, नौकऱ्या पुरविलेल्याची संख्या ७३१; १९६१ : नोंदणी १०,९७३, नौकऱ्या पुरविल्या १,०५०; १९६२ : नोंदणी १०,९४०, नौकऱ्या पुरविल्या १,०६२; १९६३ : नोंदणी ११,०६१, नौकऱ्या पुरविल्या ८८१; १९६४ : नोंदणी १४,९७०, नौकऱ्या पुरविल्या १,१८५; १९६५ : नोंदणी १६,६२९; नौकऱ्या पुरविल्या १,४३५. नौकरी करू इच्छिणाऱ्या स्त्रियांची नोंद गुजरात राज्यातील उद्योगविनिमय केंद्रात स्वतंत्र याद्दीत करण्यात येते.

## अर्बन बँकांना धोरण–कार्यपद्धती सुधारण्याचा सल्ला

" बँकिंग रेग्युलेशन ॲक्टातील काही तरतुदी सहकारी बँकांना लागू करण्यात आल्या आहेत, ह्याचा अर्थच असा की सहकारी बँकिंग आपल्या देशात आता वयात आले आहे " असे उद्गार रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य ह्यांनी राजकोट येथे राजकोट नागरिक सहकारी बँकेच्या इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी काढले. काही अर्बन बँकांच्या कारभारातील काही अनिष्ट बाबींचा उल्लेख करून ते म्हणाले, " उपलब्ध पैशाचे मानाने अप्रमाण कर्जे दिली असल्याचा प्रकार अनेक बँकांत आढळतो. तरतेपणा टिकविण्यासाठी ही परिस्थिती ताबडतोब सुधारण्यात आली पाहिजे. मालमत्तेच्या तारणावर दिलेली कर्जेही कमी करायला हवीत. कर्जे देतांना पाळावयाच्या पद्धतीतही सुधारणेला बराच वाव आहे. काही अर्बन बँकांचा दैनंदिन कारभार अद्याप कितीतरी सुधारायला हवा. निदान काही बँकांनी तरी स्वतःची धोरणे आणि कार्यपद्धती सुधारणे अत्यावश्यक आहे, हेच हे दोष सुचवितात. "

**पोलादाचा कारखाना अडला**—पाकिस्तानात दरसाल ५ लाख टन पोलाद निर्माण करणार पहिलाच कारखाना काढण्यास अमेरिका मदत देण्यास तयार आहे. पण, अमेरिकन कॉंग्रेसने परराष्ट्रांना देण्यात यावयाच्या मदतीत कपात केल्यामुळे त्याच्या उभारणीस अडथळा उत्पन्न झाला आहे.

# बँकांच्या विलीनीकरणाचा आढावा

## लहानांच्या अडचणीमुळे सुस्थितीमधील बँकांचा लाभ

काही वर्षांपूर्वीपर्यंत, हिंदी बँकिंग क्षेत्रात लहान आकाराच्या बऱ्याच बँकांचा प्रादुर्भाव होता; पण एकूण बँकिंग व्यवहारापैकी फारच थोडा व्यवहार त्यांच्या वाट्यास येई. विशेषतः मद्रास आणि केरळ येथे अशा बँका जास्त होत्या. त्यातल्या बहुतेक बँका कशाबशा चालत; तरतेपणाचा अभाव, ठेवींचा तुटवडा, त्या मानाने भरमसाट कर्जे, बिगर-तारणाची कर्जे, इत्यादी अनिष्ट गोष्टींचा त्यात भरणा होता. १९४९ चा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट झाल्यापासून रिझर्व्ह बँक अशा बँकांच्या कारभारात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आली आहे. वारंवार दिलेला सल्ला आणि सूचना न पाळणाऱ्या व न सुधारणाऱ्या बँका लायसेन्स नाकारून बंद कराव्या लागल्या. १९६० अखेर अशा रीतीने एकूण १३५ बँका ( त्यांपैकी दोन शेड्यूल्ड बँका होत्या ) बंद पडल्या.

### सक्तीसाठी कायद्यात दुरुस्ती

बँकिंग रेग्युलेशन ॲक्टात बँकांच्या विलीनीकरणाची सोय होती, पण त्यात सक्तीला वाव नव्हता. कंपनी कायद्याच्या २९३ ( १ ) ( अ ) कलमाप्रमाणे एक बँकिंग कंपनी दुसऱ्या बँकिंग कंपनीकडे आपली जिंदगी व देणी वर्ग करू शकत होती. परंतु, रिझर्व्ह बँक अशा विलीनीकरणाचे बाबतीत स्वतः सूत्रे हाती घेऊ शकत नव्हती. त्यामुळे, १९६० पर्यंत अशी विलीनीकरणे फारशी झालीच नाहीत. पलाई सेंट्रल बँक आणि लक्ष्मी बँक १९६० मध्ये बंद पडल्या. तेव्हा रिझर्व्ह बँकेच्या अधिकारात वाढ होण्याचे अगत्य स्पष्ट दिसून आले, आणि १९४९ चा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट दुरुस्त करण्यात आला. ह्या दुरुस्तीच्या अन्वये, जरूर त्या बँकांना मोरेटोरियम देण्यासाठी सरकारकडे मागणी करण्याचा रिझर्व्ह बँकेला अधिकार प्राप्त झाला. मोरेटोरियमच्या मुदतीत त्यांच्या सक्तीच्या विलीनीकरणाची किंवा त्यांच्या पुनर्घटनेची योजना तयार करणे रिझर्व्ह बँकेला शक्य झाले. त्या योजनेला सरकारची मंजुरी मिळाली, म्हणजे ती ठराविक दिवशी अमलात यावयाची अशी तरतूद करण्यात आली. खालील तक्त्यात १९६०–६५ च्या सहा वर्षांतील अशा योजनांचा तपशील देण्यात आला आहे.

| | ऐच्छिक एकत्रीकरण | सक्तीचे विलीनीकरण | स्टेट बँक कायद्याखालील विलीनीकरण | जिंदगी–कर्जे वर्ग करणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९६० ... | ६ | — | — | ५ | ७ |
| १९६१ ... | १ | ३० | २ | ३ | ३६ |
| १९६२ ... | ३ | १ | २ | ५ | ११ |
| १९६३ ... | २ | १ | ४ | १५ | २२ |
| १९६४ ... | ७ | ९ | १ | ६२ | ७९ |
| १९६५ ... | ५ | ४ | ३ | २१ | ३३ |
| एकूण... | २० | ४५ | १२ | ११ | १८८ |

अशा रीतीने, ९३६ कचेऱ्या असलेल्या १८८ बँका ५३ बँकांत विलीन झाल्या. ह्या विलीन झालेल्या बँकांच्या ठेवी १०६ कोटी रुपयांच्या होत्या. त्यांची कर्जे ६८ कोटी रुपयांची होती. विलीनीकरणाचा फायदा मिळालेल्या बँकांनी १३४ कचेऱ्या बंद केल्या किंवा त्याच ठिकाणी चालू असलेल्या स्वतःच्या कचेऱ्यांत विलीन केल्या, म्हणजे त्यांच्या एकूण कचेऱ्यांत ८०२ कचेऱ्यांची भर पडली. विलीन झालेल्या बँकांपैकी १६ शेड्यूल्ड बँका होत्या; त्यांच्या ठेवी ३२ कोटी रु. च्या होत्या व त्यांच्या कचेऱ्यांची संख्या ३६२ होती. जिंदगी व कर्जे वर्ग करून विलीनीकरण करण्याचा मार्ग १११ बँकांनी पत्करला. विलीनीकरणासाठी ४५ बँकांवर सक्ती करावी लागली; एकट्या १९६१ मध्ये ३० विलीनीकरणे ह्या मार्गे घडून आली. एकूण १८८ विलीनीकरणांपैकी १३१ विलीनीकरणे केरळ आणि मद्रास राज्यांत घडून आली. त्यांपैकी बहुतेक विलीनीकरणे जिंदगी–कर्जाच्या वर्गावर्गीने झाली. ह्या उलट महाराष्ट्रात फक्त १४ बँकांचे विलीनीकरण झाले. त्यांपैकी ८६ कचेऱ्यांच्या आठ ठिकाणी सक्तीचा अवलंब करावा लागला. १९६०–६५ काळातील विलीनीकरण त्याच प्रदेशातील बँकांशी बहुतेक प्रसंगी झाले.

### विलीनीकरणाचा राज्यवार तपशील

| | बँकांची संख्या | त्यांच्या कचेऱ्या |
|---|---|---|
| आंध्र प्रदेश ... | ३ | २४ |
| आसाम ... | १ | १ |
| गुजरात ... | ३ | ४ |
| केरळ ... | ७९ | ३७४ |
| मध्यप्रदेश ... | ४ | १७ |
| मद्रास ... | ५२ | २४४ |
| महाराष्ट्र ... | १४ | १०६ |
| म्हैसूर ... | १६ | ५७ |
| ओरिसा ... | २ | ४ |
| राजस्तान ... | ३ | ६० |
| उत्तर प्रदेश ... | ३ | १० |
| प. बंगाल ... | ६ | ३० |
| दिल्ली ... | २ | ५ |
| एकूण ... | १८८ | ९३६ |

अशा रीतीने, चालू बँकांची संख्या १९६० मध्ये ३२८ होती, ती १९६५ अखेर ९४ वर उतरली. ५ लक्ष रुपयांपेक्षा कमी वसूल भांडवल–गंगाजळी असलेल्या बँकांची संख्या २१३ वरून १८ वर आली; त्यापेक्षा अधिक वसूल भांडवल–गंगाजळीच्या बँकांची संख्या ११५ ची ७६ झाली. त्यामुळे लहान बँकांचे एकूण बँकांशी पडणारे प्रमाण ६५% चे १९% वर घसरले; ह्या उलट मध्यम आकाराच्या व मोठ्या आकाराच्या बँकांचे प्रमाण ३५% चे ८१% झाले. १९६० मध्ये, तोटा दाखविणाऱ्या बिगर–शेड्यूल्ड बँका २४ होत्या; त्यांची संख्या १९६५ मध्ये चारावर आली.

विलीनीकरणामुळे ह्या सर्व बँकांचा चांगलाच फायदा झाला. त्यांपैकी मोठ्याल्या बँकांचा ( कॅनरा बँक, सिंडिकेट बँक, महाराष्ट्र बँक ) लहान बँकांपेक्षा (स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, सांगली बँक इत्यादी ) मोठा फायदा झाला; पण लहान बँकांच्या स्वतःच्या ठेवींच्या व कर्जाच्या मानाने त्यांच्यावरील परिणाम मोठा होता. मोठाल्या बँकांना २० कोटी रु. च्या ठेवी व ९ कोटी

रुपयांची कर्जे मिळाली, पण त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या ठेवीतील वाढीच्या मानाने ही वाढ २०% आणि कर्जातील वाढीच्या मानाने ही वाढ १०% होती. ह्या उलट, लहान बँकांना ११ कोटी रु. च्या ठेवी व ३ कोटी रुपयांची कर्जे मिळाली, पण त्यांच्याकडील ठेवीवाढीशी व कर्जवाढीशी त्यांचे प्रमाण अनुक्रमे ४७% व २७% पडले. विलीनीकरणामुळे कित्येक लहान बँकांचे खेळते भांडवल वाढून कार्यक्षेत्रही विस्तारले, तर मोठाल्या बँकांच्या प्रतिष्ठेत वाढ झाली.

## लिमिटेड कंपन्यांच्या राजकीय देणग्या

१९६१ च्या मध्यापासून मार्च १९६६ अखेर कंपन्यांनी राजकीय फंडांना मदत केलेल्या रकमांचा तपशील पाहाता काँग्रेसला सर्वांत जास्त (१,०९,६०,३६५ रु.) रक्कम मिळाली, असे दिसून येते. त्या खालोखाल स्वतंत्र पक्षाला १५,९९,४२४ रु. मिळाले. पी. एस्. पी. पक्षाला ५७,१५५ रु., तर कम्युनिस्ट पक्षाला ३,१७४ रु. मिळाले. जनसंघ ६,९८५ रु., हिंदुमहासभा १,१५१ रु., आर. एस. पी. ३० रु., गणतंत्रपरिषद १२,००० रु., असे इतर काही आकडे आहेत.

## ७६ बँकांच्या ४५९ कचेऱ्या पचवणाऱ्या आठ निवडक बँका

### १९६० ते ६५ मधील व्यवहार

(आकडे लक्ष रुपयांचे)

| | ठेवी | | कर्जे | | कचेऱ्या | | विलीनीकरणामुळे मिळालेल्या कचेऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९६० | १९६५ | १९६० | १९६५ | १९६० | १९६५ | |
| कॅनरा बँक | २९९० | ९८५६ | १६२३ | ५९५७ | ८४ | २३९ | १३२ |
| सिंडिकेट बँक | १८८७ | ५८०१ | १२२४ | ३७२५ | १४० | २०६ | ४३ |
| महाराष्ट्र बँक | १४९७ | ४४५३ | ६८३ | २६११ | ५३ | १०० | २४ |
| स्टेट बँक ऑफ त्रावणकोर | ८२७ | २९७४ | ४१० | १५१२ | २७ | १२३ | ९१ |
| साऊथ इंडियन बँक | ४७४ | ८५९ | ३२५ | ६४४ | २९ | ७१ | ३३ |
| सांगली बँक | २१९ | ५७० | १३६ | ४०८ | १६ | ३९ | १२ |
| धनलक्ष्मी बँक | ६४ | १५४ | २९ | १०५ | ३ | १८ | १५ |
| कॅथॉलिक सिरियन बँक | २७९ | ४२३ | १७८ | २७४ | २४ | ४० | १६ |

## ब्रिटनमधील पाकिस्तानचा प्रचार

पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान अलीकडेच ब्रिटनचा १० दिवसांचा दौरा करून परत आले. त्या वेळी लंडनमधील पाकिस्तानच्या हायकमिशनने प्रचाराची धमाल उडवून दिली. त्यांपैकी एका प्रचारपत्रकात पश्चिम पाकिस्तानचा इतिहास देऊन असे म्हटले आहे, की सुमारे सहा शतकांच्या कालात पाकिस्तानच्या सध्याच्या राज्यकर्त्यांच्या पूर्वजांनी भारतावर राज्य केलेले आहे आणि कला, स्थापत्य, संस्कृती, इत्यादी क्षेत्रांतील वारसा भारताला दिला आहे. दौऱ्याच्या निमित्ताने काही नकाशेही प्रसृत करण्यात आले. एका नकाशात जम्मू व काश्मीर ह्या भूभागाचा वादग्रस्त प्रदेश म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. नकाशात पाक-भारत युद्ध समाप्तीनंतर अस्तित्वात आलेल्या युद्धबंदी रेषेचा मागमूसही नाही. पण ह्याच नकाशात एका टोकात छापलेल्या दुसऱ्या छोट्या नकाशात पाकिस्तान व काश्मीर ह्यांच्यामधील सरहद्द पुसूनच टाकण्यात आली आहे.

## ओरिसामधील मुलांच्या विक्रीची पद्धत

ओरिसामधील जुनागढ ब्लॉक विभागात लहान मुलांची खरेदी-विक्री समाजमान्य पद्धत आहे, असे आढळून येते. खरेदीदाराची जात विक्रेत्याच्या जातीपेक्षा उच्च असावी, असा संकेत आहे. गौड आणि सौर जमातीमधील मुलांना अधिक मागणी असते. समान दर्जाच्या जातीत मुलांची विक्री करणे कमीपणाचे मानले जाते. मुलीची किंमत साधारणतः ४० ते ६० रुपये, तर मुलाची किंमत ६० ते १०० रुपये असते. तीन ते पाच पंचांच्या साक्षीत विक्रीपत्रावर उभय पक्षाच्या सह्या होतात; खरेदीदार हा करार स्वतःजवळ ठेवतो.

## स्वनातीत विमानांच्या एंजिनाची चाचणी

स्वनातीत वेगाने उड्डाण करू शकणाऱ्या एका विमानाच्या एंजिनाची चाचणी हिंदी आणि इजिप्शिअन वैमानिक करीत आहेत. विमान लष्कराच्या उपयोगासाठी तयार व्हावयाचे असून १९६८ च्या सुमारास त्याच्या एंजिनाच्या उत्पादनास प्रारंभ होण्याची शक्यता आहे. एंजिनाची निर्मिती जर्मन आणि ऑस्ट्रिअन तंत्रज्ञांच्या साह्याने करण्यात येत आहे. त्यासाठी इजिप्तने २०० तंत्रज्ञ कामावर ठेवले आहेत. इजिप्तचे सरकार आवाजापेक्षा अधिक गतीने भ्रमण करणाऱ्या विमानांची निर्मिती करण्याचे प्रयत्न करीत आहे. पुढेमागे अशी लढाऊ विमाने जागतिक बाजारपेठेत उतरविण्याचाही इजिप्तचा विचार आहे. किंमतीच्या दृष्टीने ही विमाने बरीच स्वस्त असतील असे सांगण्यात येत आहे.

## ऱ्होडेशियाचा साखर निर्यात-वाटा हिंदला?

कॉमनवेल्थ राष्ट्रगटात असलेल्या साखर कराराप्रमाणे ब्रिटन राष्ट्रकुलातील देशांकडून २३ लाख टन साखर दरसाल विकत घेत असते. त्यांपैकी ६ लाख, ५० हजार टन वेस्ट इंडीजकडून, ६ लाख टन मॉरिशसकडून, २ लाख ५० हजार टन ऑस्ट्रेलियाकडून, आणि २५ हजार टन ऱ्होडेशियाकडून आयात करण्यात येते. ऱ्होडेशियातील स्मिथ राजवटीवर ब्रिटनने व्यापारी बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे त्या देशाकडून ब्रिटन सध्या साखर आयात करीत नाही. ऱ्होडेशियाच्या साखरनिर्यातीचा वाटा भारताला मिळावा म्हणून उभयता देशात वाटाघाटी चालू आहेत. राष्ट्रकुलातून ब्रिटनमध्ये आयात करण्यात येणाऱ्या साखरेची किंमत आंतरराष्ट्रीय किमतीपेक्षा अधिक असते.

## बँकांतील ठेवींवरील नवे अधिकृत कमाल दर

### २ जानेवारी, १९६७ पासून अंमलबजावणी

| | व्याज |
|---|---|
| १४ दिवसांपर्यंतच्या मुदतीच्या ठेवींवर आणि १४ दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या मुदतीच्या नोटिशीने परत मागण्याच्या / देण्याच्या कराराच्या ठेवीवर ........................ | नाही |
| १५ ते ४५ दिवसांच्या मुदतीच्या ठेवीवर आणि १५ ते ४५ दिवसांच्या नोटिशीने परत मागण्याच्या / देण्याच्या कराराच्या ठेवीवर... | दरसाल १½% |
| ४६ ते ९० दिवसांच्या मुदतीच्या ठेवीवर आणि ४६ ते ९० दिवसांच्या नोटिशीने परत मागण्याच्या / देण्याच्या कराराच्या ठेवीवर.......................... | दरसाल ३% |
| मुदत ठेवी | |
| ९१ दिवस ते ६ महिन्यांपेक्षा कमी | ,, ४½% |
| ६ महिने ते ९ महिन्यांपेक्षा कमी | ,, ५ % |
| ९ महिने ते १ वर्षापेक्षा कमी | ,, ५½% |
| १ वर्ष ते २ वर्षांपेक्षा कमी | ,, ६ % |
| २ वर्षे ते ३ वर्षांपेक्षा कमी | ,, ६¼ % |
| ३ वर्षे ते ५ वर्षांपेक्षा कमी | ,, ६½% |
| ५ वर्षे आणि त्यापेक्षा जास्त मुदत | ,, ७ % |

### शस्त्रास्त्राबाबत स्वावलंबी झाले पाहिजे.

भारताच्या संरक्षणाविषयी नागपूर येथे बोलताना ले. जनरल थोरात ह्यांनी संरक्षणासाठी लागणाऱ्या सर्व सामग्रीच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याची जरुरी प्रतिपादिली. ते म्हणाले की भारताला लागणारी संरक्षणविषयक सामग्री देशातील कारखाने तयार करू शकतात. तथापि युद्ध चालू झाल्यावर देशाची संपूर्ण अर्थ-व्यवस्था युद्धसन्मुख करणे हे अवघड काम आहे. म्हणून युद्ध-काळी अमलात आणावयाच्या अर्थशास्त्रीय उपायांची योजना आधीच तयार ठेवण्यात आली पाहिजे. आर्थिक कारणे सोडली तरी इतर अनेक कारणांमुळे पाश्चात्य देश भारताला पाहिजे असणारे युद्धसाहित्य पुरविण्यास तयार नसतात. युद्धसामग्रीचे उत्पादन करण्याचे सामर्थ्य आणि तांत्रिक ज्ञान भारताजवळ आहे. त्याचा उपयोग करून आग्नेय आशियातील देशांना युद्ध-साहित्य पुरविणे शक्य आहे. आशियामधील शांतताप्रिय देशांच्या हिताच्या दृष्टीने अशा प्रकारचा उपक्रम योग्य होईल.

### अंदमान-निकोबार बेटांच्या विकासाची योजना

अंदमान आणि निकोबार ह्या द्वीपसमूहांच्या विकासाची सर्वंकष योजना भारत सरकारने तयार केली आहे. ४ थ्या पंचवार्षिक योजनेअखेर ह्या बेटांतील सध्याची लोकसंख्या दुपटीने वाढविण्यात येणार आहे. पाचव्या कार्यक्रमात तीन आणखी १ लाखाची भर टाकण्यात येईल. येत्या १० वर्षांत लागवडीसाठी जमीन तयार करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जंगलातील साधन-सामग्रीच्या साह्याने निघू शकणारे उद्योगधंदे आणि साखरेची निर्यात करण्यास सोयीचा असा एक साखर कारखानाही काढ-ण्यात येणार आहे. बेटातील मच्छीमारीच्या धंद्याची वाढ करून दरसाल २ हजार टन मासे पकडण्याइतपत व्यवस्था करण्यात येईल. त्याचशिवाय जोडीला डबाबंद मासे भरण्याचा एक कार-खाना निर्यातीच्या दृष्टीने उभारण्यात येणार आहे. ६ हजार एकरांत रबराची लागवड करण्यात येणार आहे.


महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४-७५,
२५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,७८,२५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ३,१९,७१,००० |
| ठेवी | ... | रु. | ४९,५८,९६,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | ९१,८७,२५,००० |


: शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. बु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हॅंड पंप्स्, हॅंड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
( विश्रामबाग—सांगली महाराष्ट्र )

### स्टॉकहोमधील विद्यार्थ्यांपुढील प्रश्न

स्टॉकहोममधील विद्यार्थ्यांचे वर्गात असावे तसे लक्ष असत नाही पण त्याची कारणे राजकीय मात्र नाहीत. त्यांना दुधासाठी रडणाऱ्या स्वतःच्या मुलांची काळजी वाटत असते. ह्या शहरांतील २५ टक्के विद्यार्थी लग्न झालेले असतात आणि त्यांच्यापैकी निम्मे पितृपदालाही पोचलेले असतात. विद्यार्थ्यांना झालेल्या मुलांची एकूण संख्या ५,००० असून त्यांपैकी ७०० च मुले विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात राहू शकतात. मुलांची देखभाल करणाऱ्या बालगृहांची संख्या फक्त तीन आहे. तेथे सर्व मुलांची सोय होणे शक्य नाही. विद्यार्थ्यांच्या मुलांची देखभाल करण्यासाठी आणखी बालगृहे बांधण्याचा प्रश्न आता सरकारने हाती घेतला आहे. तथापि, सध्या अशी स्थिती आहे की बहुसंख्य विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच मुलांची निगा राखण्याचे कामही करावे लागते.

---

### आणखी एक प्रश्न

एका बँकेच्या कलकत्ता शाखेत अ आणि ब ह्यांचे जॉइंट खाते आहे. दोहोंपैकी कोणीही किंवा कोणाच्याही मृत्यूनंतर उरलेल्या एकाने खाते चालवावयाचे आहे. ब हा नादार ठरविला गेला असून त्याप्रमाणे बँकेवर नोटीस वजावण्यात आली. अने काढलेल्या १,००० रुपयांचा चेक बँकेत वटविण्यासाठी आला. त्या चेकबाबत इतर काही हरकत घेण्याजोगी नसल्यास तुम्ही त्याचे पैसे द्याल का? उत्तर देताना बँकेवरील जबाबदारीची चर्चा करा.

---

### भारतामधील मानसिक रोग्यांची संख्या


ऑस्ट्रेलिया आणि भारत ह्या देशांतील वैद्यकीय तज्ज्ञांनी उभय देशांतील मानसिक आरोग्यावर रेडिओवरून चर्चा केली. ह्या चर्चेच्या निमित्ताने भारतामधील मनोव्यथेने ग्रासलेल्या लोकांची माहिती बाहेर आली आहे. निरनिराळ्या प्रकारच्या मनोव्यथांनी पछाडलेल्या लोकांची भारतामधील संख्या ९६ लाखाच्या आसपास आहे. मनोव्यथांच्या अनेक प्रकारांपैकी विचार, भावना आणि कृती ह्यांच्यातील सुसंवाद व अनुसंधान तुटल्याची मनोव्यथा भारतात सर्वात अधिक आढळून येते. मानसिक रोगावर उपचार करणाऱ्या प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांची संख्या अवघी ३०० आहे. देशाची लोकसंख्या ४८ कोटींच्या घरात असून त्यांपैकी जवळजवळ १ कोटी लोक मानसिक रोगी आहेत. परंतु, अवघ्या १८ हजार मानसिक रुग्णांचीच इस्पितळातून सोय आहे.


---

### पाकिस्तानच्या लष्करात असंतोष

१९६५ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या संघर्षानंतर अध्यक्ष अयूबखान ह्यांनी ११ जनरल्स आणि ३९ कर्नल्सना सक्तीने निवृत्त केले आहे. अयूबखान ह्यांच्या धोरणाशी मतभेद झाल्याने त्यांच्यावर हा प्रसंग ओढवला. त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल तक्रार नव्हती. पाकिस्तानने चीनकडून शस्त्रास्त्रे घेण्यास ह्या अधिकाऱ्यांचा विरोध होता. पाकिस्तानला चीनकडून ६ तुकड्यांना पुरेल इतकी शस्त्रसामग्री मिळाली आहे. त्याशिवाय काही लढाऊ विमानेही मिळाली आहेत. भारत–पाक युद्धाच्या वेळी अमेरिकन मदतीवर विसंबल्याने पाकिस्तानवर जो प्रसंग ओढवला होता तसाच प्रसंग चीनवर अवलंबून राहण्याने ओढवण्याचा संभव काही लष्करी अधिकाऱ्यांना वाटत आहे.



धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...
परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहीत...

बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारे, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेंच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
२ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)
TOM & BAY
KO: 667-A MAR

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure
by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

### कमीत कमी गुंतवणूक, जास्तीत जास्त परदेशी हुंडणावळ

परदेशी प्रवाशांपासून भारताला १९५८ मध्ये १७ कोटी रु., १९५९ मध्ये १९ कोटी रु., १९६४ मध्ये २६ कोटी रु. आणि १९६५ मध्ये २० कोटी रु. मिळाले. उत्तर अमेरिका, पश्चिम युरोप आणि पश्चिम आशिया व आग्नेय आशिया येथून मुख्यत: हे प्रवासी येतात. १९६५ मधील परदेशी प्रवाशांपैकी एकट्या उत्तर अमेरिकेतले २६.६% होते. येथे येणारे प्रवासी जगाला फेरी मारण्यासाठी निघालेले असतात. वाटेत काही दिवस ते भारतात घालवितात. कमीत कमी गुंतवणुकीने जास्तीत जास्त परदेशी हुंडणावळ मिळवून देणारा हा धंदा आहे. निसर्गसौंदर्य, पुराणवास्तू, जंगली श्वापदे ह्यांच्या दर्शनाच्या मोबदल्यात परदेशी चलन मिळू शकते! हस्तव्यवसायाच्या जिनसा परदेशी प्रवासी येथे जागेवरच विकत घेतात, त्यामुळे वहातुकीचा खर्चही वाचतो. भारतात परदेशी प्रवाशांना सुखाने, गतीने प्रवास करता आला, त्यांची राहण्याची व खाण्यापिण्याची उत्कृष्ट व्यवस्था झाली, म्हणजे हा धंदा खूप भरभराटीस येऊ शकेल.

### हिंदच्या रोजखपाच्या वस्तूंना रशियात वाव

भारत आणि रशिया ह्या दोन देशात नुकताच एक व्यापारी करार करण्यात आला आहे. रशियात नित्योपयोगी मालाची अजूनही टंचाई आहे. एखादी वस्तू दुकानात आल्याबरोबर ती हातोहात विकली जाते अशी माहिती रशियाला जाऊन आलेले हिंदी प्रवासी सांगतात. त्यावरून असे दिसते की अनेक प्रकारच्या नित्योपयोगी मालाच्या उठावाला रशियाची बाजारपेठ अनुकूल आहे. आतापर्यंत भारताने रशियाला कापड, बूट, हस्तव्यवसायाच्या वस्तू, खेळणी, इत्यादी माल पुरविलेला आहे. रशियातील स्त्रिया अलीकडे टापटीपीचा व अद्ययावत पोषाख करू लागल्या आहेत. तेव्हा स्त्रियांना लागणारी सौंदर्यप्रसाधनाची साधने रशियाला पुरविता येण्यासारखी आहेत.गेल्या काही वर्षात भारताने डबाबंद फळांचा धंदा वाढविला आहे. डबाबंद फळांचा पुरवठाही रशियाला करता येईल. रशियाच्या सप्तवार्षिक कार्यक्रमात आता नित्योपयोगी वस्तूंच्या उत्पादनावर जोर देण्यात येऊ लागला आहे.

### अन्नपदार्थांमधील भेसळीचे मोठे प्रमाण

अन्नपदार्थांत करण्यात येणाऱ्या भेसळीबद्दल अधिकृत आकडेवार माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. भेसळीचे प्रमाण राजस्थानात सर्वांत अधिक म्हणजे ५१ टक्के आहे. १९६६ च्या ऑगस्ट महिनाअखेर संपलेल्या ६ महिन्यांत राज्यात भेसळीच्या संशयावरून अन्नपदार्थांचे ९,०६९ नमुने तपासण्यात आले. त्यांपैकी ५,८६५ पदार्थांत भेसळ असल्याचे आढळून आले. राजस्थानच्या खालोखाल महाराष्ट्र व मध्य प्रदेश ह्या राज्यांतून भेसळ आढळून येते. तिचे प्रमाण अनुक्रमे ४९ व ४८ टक्के आहे. १२ राज्यांत मिळून अन्नपदार्थांचे १ लाख, ४० हजार नमुने तपासण्यात आले. त्यांपैकी ४८ हजार पदार्थांत भेसळ आढळून आली. अन्नपदार्थांत भेसळ करण्याच्या गुन्ह्यासाठी १,५०० लोकांना शिक्षा देण्यात आल्या. १० हजार आरोपींची प्रकरणे अद्याप कोर्टात आहेत. खटल्यांतील दंडामुळे सरकारला २३ लाख रुपये मिळाले.

### बोकॅरो पोलाद कारखान्याबाबत नवा पायंडा

बोकॅरो येथे उभारण्यात यावयाच्या पोलादाच्या कारखान्याच्या बांधणीसाठी ६८१ कोटी रुपये खर्च येणार आहे. कारखान्याच्या उभारणीचे काम करणाऱ्या अधिकारीवर्गाला भारत सरकारने खर्चाबाबत बरेच स्वातंत्र्य दिलेले आहे. अर्थात, एकूण खर्चाच्या मर्यादेतच ते देण्यात आलेले आहे. आतापर्यंतची प्रथा अशी होती की सार्वजनिक मालकीच्या विभागांतील विकासाची कामे करताना ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करावयाचा असेल तर त्यासाठी मध्यवर्ती सरकारची मंजुरी घ्यावी लागे. सरकारने बोकॅरो कारखान्याच्या अधिकारी मंडळाला कारखान्याचा सर्व खर्च सरकारची वेळोवेळी मंजुरी न घेतां करण्याची मुभा दिलेली आहे. सार्वजनिक विभागांतील औद्योगिक उभारणीबाबत सरकारने हा नवाच पायंडा पाडलेला आहे. औद्योगिक संघटनांच्या उभारणीचे काम द्रुतगतीने व्हावे म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. बोकॅरो येथील कारखान्याचा पहिला टप्पा १९७१ मध्ये पुरा होईल त्यावेळी कारखान्याची उत्पादनक्षमता १७ लाख टनांची असेल. कारखान्याच्या जागी सोव्हिएट रशियाकडून ३ हजार टन वजनाची यंत्रोपकरणे आतापर्यंत आलेली आहेत. कारखान्याच्या उभारणीसाठी एकूण सुमारे २ लाख, ९० हजार टन वजनाची यंत्रसामग्री लागणार आहे. त्यांपैकी १ लाख, ६ हजार टन यंत्रसाहित्य रशिया पुरविणार आहे. बाकीची १ लाख, ८४ हजार टन वजनाची यंत्रसामग्री भारतामधील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांतील कारखान्यांकडून पुरविण्यात येणार आहे. भारतात तयार करण्यात यावयाच्या यंत्रसाहित्याचे आराखडे रशियातील तज्ज्ञांकडून करविण्यात आले आहेत. त्यांचा उपयोग करून येथील कारखान्यांनी ते तयार करावयाचे आहे.

### केसांच्या टोपांची अमेरिकेला निर्यात

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या मद्रास राज्यांतील कारखान्याने मानवी केसापासून बनविलेले अनेक प्रकारचे टोप निर्यात करण्याचा करार एका अमेरिकन कंपनीशी केला आहे. कराराची मुदत ७ वर्षांची असून त्याप्रमाणे पहिल्या हप्त्याची पाठवणी विमानाने करण्यात आली. करारात ठरलेल्या अटींप्रमाणे ४ वर्षांच्या अवधीत टोपांची निर्यात क्रमाक्रमाने वाढविण्यात येणार आहे. पहिल्या वर्षी १५ लाख डॉलर्सचे, दुसऱ्या वर्षी २० लाख डॉलर्सचे, तिसऱ्या वर्षी ३० लाख डॉलर्सचे आणि त्यापुढील वर्षात दरसाल ४० लाख डॉलर्सचे टोप खपविण्याची हमी अमेरिकन कंपनीने घेतली आहे. टोपाव्यतिरिक्त केसापासून तयार केलेल्या इतर वस्तूही निर्यात करण्यात यावयाच्या आहेत. कराराच्या ७ वर्षांच्या कालात अमेरिकन कंपनी कमीतकमी २.२५ कोटी डॉलर्स किमतीचे टोप व इतर वस्तू आयात करील असा अंदाज आहे. अमेरिकेत टोपांची विक्री करण्याची संघटना कंपनी उभारील. भारतामधील कारखान्याने ठरल्यापेक्षा अधिक संख्येने टोपांचा पुरवठा केल्यास त्यांची विक्री अमेरिकन कंपनी स्वतःच करणार आहे. सात वर्षांच्या अखेरीस विक्रीच्या व्यवहाराचा आढावा घेण्यात येऊन त्यात होणाऱ्या नफ्यात स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला वाटा देण्यात येईल. मद्रास राज्यातील हा टोपांचा कारखाना १ वर्षापूर्वी चालू करण्यात आलेला आहे. त्यात सुमारे ४०० स्त्रीपुरुष कामगार काम करीत असतात. हाँगकाँगमधील एका कंपनीकडून कारखान्याने तांत्रिक मदत मिळवलेली आहे.

### मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या औषधांचे उत्पादन

मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य व कुटुंबनियोजन खात्याने आवश्यक औषधांबाबत सल्ला देण्यासाठी एक कमिटी नेमली होती. कमिटीने अनेक शिफारसी केल्या आहेत. एक शिफारस अशी आहे की मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या औषधांच्या उत्पादनाची व्यवस्था सार्वजनिक मालकीच्या संघटनेकडे सोपविण्यात यावी. आयात कराव्या लागणाऱ्या औषधांविषयी कमिटीने असे सुचविले आहे की त्यांच्या निर्मितीचे प्रयत्न देशात करण्यापूर्वी अशा औषधांसाठी लागणारे परदेशीय चलन, त्याबाबतचे पेटंटचे हक्क आणि ती देशात तयार करावयाची झाल्यास त्यासाठी येणारा उत्पादनाचा खर्च, ह्या सर्व बाबींची नीट चौकशी करण्यात यावी. वैद्यकीय व्यवसायांत गुंतलेल्या लोकांनी आयात होणाऱ्या औषधाच्या ऐवजी देशी औषधे सुचवावीत अशीही विनंती करण्यात आली आहे.

### मुंबईमधील वाढत्या गर्दीचे संकट

मुंबईतील वाढत्या गर्दीचे संकट ही टांगती तलवार आहे. ही गर्दी कमी करण्याचे राहोच पण अधिक न होण्याचा उपायही सापडणे कठीण झाले आहे. ह्या आगामी धोक्याची काहीशी कल्पना मुंबईचे मेयर श्री. पाटकर ह्यांनी दिली आहे. मुंबईमधील कुटुंबनियोजन मोहिमेत बोलताना ते म्हणाले की शहराच्या लोकसंख्येला आळा घालण्याचा काही प्रभावी उपाय योजला नाही तर आणखी १५ वर्षांच्या अवधीत लोकसंख्या आजच्या ४५ लाखावरून ७५ ते ८० लाखाच्या घरात जाईल. मुंबई शहरात रोज सुमारे ४५० नवी बालके जन्माला येतात व १५० लोक मरण पावतात. दर हजारी जन्मणाऱ्या मुलांच्या संख्येत तर वाढ झालीच आहे, पण दरसाल १ लाख लोक बाहेरून मुंबईत येतात. इतक्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येची सोय करणे हे अतिशय अवघड होऊन बसलेले आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
( रजिस्टर्ड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )
स्थापना : १६ सप्टेंबर १९३५

| | १९५५ | १९६० | १९६६ |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. १६ लक्ष | रु. ३२ लक्ष | रु. १ कोटी |
| गंगाजळी | रु. ७·७५ लक्ष | रु. १७ लक्ष | रु. ३७ लक्ष |
| ठेवी | रु. ५ कोटी | रु. १५ कोटी | रु. ५० कोटींहून अधिक |

आपल्या ११० शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध
विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टी सेवा यांच्यासह बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
सविस्तर माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.
कर्वे रोड, ( पुणे-४ ), क्रॉफर्ड मार्केट ( मुंबई ) येथे लौकरच शाखा सुरू होत आहेत.

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.